नि.फौ.ख.क्र ८००००४/२०१०
सरकार वि. मोनु व इतर
नि.क्र.०९

<u>फौ.प्र.सं. कलम २९९ अंतर्गत पुरावा नोंदविण्यात येत आहे.</u>
<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.४ यांचा पुरावा</u>.
**मी शपथेवर कथन करतो की,**
**माझे नाव – सुरेंद्र महादेवराव ढोके,**
**वय– ५५ वर्ष, व्यवसाय– शेती ,**
**रा. अनुसयापुरम, ता. काटोल, जि. नागपूर**
**यांचा सरतपास, सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.टी. धास्कट यांच्या मार्फत सुरु –**
**(वेळ– १२.१५)**

मला दिनांक २६.०४.२००९ रोजी पोलिसांनी घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यासाठी बोलाविले नव्हते. पोलिसांनी माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा तयार केला नव्हता. आता मला पंचनामे दाखविण्यात आले. त्यावर माझी सही आहे. ती मी ओळखतो. पंचनाम्यातील मजकूर मला माहिती नाही. सहीस **<u>निशाणी क्र. १० व ११</u>** देण्यात येते.

**सदर साक्षीदार हा अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने, त्यास उलटतपास सदृश्य प्रश्न विचारण्याची परवानगी मागण्यात आली. अभिलेखाचे अवलोकन करता भारतीय साक्ष पुरावा कलम १५४ नुसार सदर परवानगी देण्यात आली.**

हे म्हणणे खरे नाही की, मला दिनांक २६.०४.२००९ रोजी पोलिसांनी घटनास्थळ व जप्ती पंचनाम्यासाठी चावळी पर्बत शिवार येथे बोलाविले. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष कोणताही पंचनामा तयार केला. हे म्हणणे खरे नाही की, मी पंचनामा वाचून त्यावर सही केली. हे म्हणणे खरे नाही की, पोलिसांनी माझ्यासमक्ष आरोपीकडून बियर बॉटलचे काचेचे अकरा तुकडे जप्त केले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचा असल्यामुळे मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पुर्ण.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

**स्वा/–**
आर. आर. पकडे
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
काटोल

ठिकाण:काटोल
दि. २४.०६.२०२६ .

नि.फौ.ख.क्र ८००००४/२०१०
सरकार वि. मोनु व इतर
नि.क्र.१२

**<u>फौ.प्र.सं. कलम २९९ अंतर्गत पुरावा नोंदविण्यात येत आहे.</u>**
**<u>अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क्र.५ यांचा पुरावा</u>.**
**मी शपथेवर कथन करतो की,**
**माझे नाव – राहुल संतोषराव सहारे ,**
**वय– ५५ वर्ष, व्यवसाय– मजुरी ,**
**रा. रेल्वे स्टेशन, ता. काटोल, जि. नागपूर**
**यांचा सरतपास, सहायक सरकारी अभियोक्ता श्रीमती पी.टी. धास्कट यांच्या मार्फत सुरु –**
**(वेळ– १२.२५)**

मी आरोपींना ओळखत नाही. मी फिर्यादीस ओळखत नाही. मला घटनेबाबत काहीही माहिती नाही. पोलिसांनी माझा जबाब नोंदविल्याचे मला आठवत नाही.

**सदर साक्षीदार हा अभियोग पक्षास सहकार्य करत नसल्याने, त्यास उलटतपास सदृश्य प्रश्न विचारण्याची परवानगी मागण्यात आली. अभिलेखाचे अवलोकन करता भारतीय साक्ष पुरावा कलम १५४ नुसार सदर परवानगी देण्यात आली.**

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक २६.०४.२००९ रोजी मी माझ्या घरी हजर असताना युवराज उमाठेच्या बोलविण्यावरुन मी त्याच्या घरी गेलो. हे म्हणणे खरे नाही की, मी त्या दिवशी उमाठे सोबत पर्बत धाब्यावर दारु पिण्यासाठी गेलो. हे म्हणणे खरे नाही की, तेथे आरोपींनी बियरच्या बॉटल फोडून मला व इतरांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी काउंटरजवळील रु.१२,०००/– हिसकावून नेले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपीने विरेंद्र पर्बत याच्या गळयातील सोन्याची चेन व रु.२२००/– जबरदस्तीने हिकावून पळून नेले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपींनी ढाब्यासमोर उभे असलेल्या बोलेरो गाडीचे काच फोडून त्याचे नुकसान केले. हे म्हणणे खरे नाही की, आरोपी माझ्या ओळखीचा असल्यामुळे मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**सरतपास पूर्ण.**

**श्रवणोत्तर स्विकृत,**

**स्वा/–**
आर. आर. पकडे
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
काटोल

ठिकाण:काटोल
दि. २४.०६.२०२६ .

**<u>प्रमाणपत्र</u>**

मी खात्रीपूर्वक असे कथीत करते की, पी.डी.एफ. फाईल मधील साक्षपुरावा हे मुळ साक्षपुराव्या प्रतीप्रमाणे तंतोतंत शब्दशः बरोबर आहे.

लघुलेखकाचे नाव – आर.एम.परमाल (नि.श्रे.)